# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ
# कोंकण भवन, नवी मुंबई -४०० ६१४.

दूरध्वनी/फॅक्स क्रमांक : ०२२ २७५७९४६३. Email ID : ic.konkan@maharashtra.gov.in

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल.**

**अपिल क्रमांक : केआर-२३६६/२०१६, सुनावणीचा दिनांक : १६/३/२०१७**

श्री.सुदेश रोहरा , ... अपिलार्थी
३०१, गायत्री अपार्टमेंट,
बँक ऑफ बडोदा जवळ, नेहरु चौक,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००२.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, ... प्रतिवादी
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर,
तळ मजला, मुख्यालय, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००३.

प्रथम अपिलीय प्राधिकारी, सामान्य प्रशासन विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर,
तळ मजला, मुख्यालय, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००३.

**विवेचन**

| | |
|---|---|
| **माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक -** | **: २१.३.२०१६** |
| **जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक -** | **: निरंक** |
| **प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक -** | **: २८.४.२०१६** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक -** | **: निरंक** |
| **व्दितीय अपिल प्राप्त झाल्याचा दिनांक -** | **: २.५.२०१६** |

सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री.अच्युत सासे, मुख्य लिपीक, सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर मनपा उपस्थित आहेत.

अपिलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (१) नुसार दि.२१.३.२०१६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थी यांच्या दि.३०.१२.२०१५ रोजीच्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईसंदर्भात माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती न दिल्यामुळे अपिलकर्ता यांनी दि.२८.४.२०१६ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपिलावर विहीत मुदतीत सुनावणी घेतली नाही व आदेश पारीत केलेले नाहीत.

अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नसल्याचे व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी न घेतल्याचे नमूद करुन आयोगाकडे प्रस्तुत अपील दि.२.५.२०१६ रोजी दाखल केले. अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांना द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने नोटीस काढून उपस्थित रहाण्याबाबत कळविण्यात आले.

**सुनावणीचा तपशील**

**अपिलकर्ता सुनावणीची सुचना देवूनही गैरहजर आहेत.**

जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज संबंधित विभागाकडे दि.२२.३.२०१६ रोजी हस्तांतर केलेला आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

२. अपिल अंशत: मान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ६(३) अन्वये माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी, आयुक्त कार्यालय, उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडे हस्तांतर करावा.

४. जन माहिती अधिकारी, आयुक्त कार्यालय, उल्हासनगर महानगरपालिका यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(९) मधील तरतुदीच्या अनुषंगाने अपिलार्थीस त्यांच्या दि.३०.१२.२०१५ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य पुरवावी.

५. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**सही/-**
**(थँक्सी फ्रान्सिस थेकेकरा)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ मार्च, २०१७.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना,**
जन माहिती अधिकारी, आयुक्त कार्यालय,
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००३.

**विवेचन**

आयोगाच्या उपरोक्त आदेशान्वये अपीलार्थीस १५ दिवसात माहिती उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आले होते. तथापि तक्रारकर्तास आयोगाच्या आदेशानुसार माहिती मिळाली नसल्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम १८ नुसार दि.१७/६/२०१९ व १३/८/२०१९ रोजी आयोगाकडे तक्रार दाखल केली.

आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता दिसून आले की, आयोगाच्या दि.१६/३/२०१७ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.३ नुसार जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर मनपा यांनी अर्जदार यांचा दि.२१/३/२०१६ रोजीचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी, आयुक्त कार्यालय, उल्हासनगर मनपा यांचेकडे हस्तांतरित केलेला नसल्याने **तसेच** आयोगाच्या आदेशातील मुद्दा क्र.४ नुसार दि.२१/३/२०१६ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरून (दि.३०/१२/२०१५ रोजीच्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईसंदर्भात माहिती) या माहितीसंदर्भात तत्कालिन जन माहिती अधिकारी, आयुक्त कार्यालय, उल्हासनगर मनपा यांनी माहिती दिलेली नाही म्हणून ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम २०(१) अन्वये शास्तीस पात्र असून त्यांचेवर रू.२५०००/- इतकी शास्ती का लादण्यात येवू नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. आयोगाच्या दि.१६/३/२०१७ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.३ नुसार तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.अच्युत सासे, मुख्य लिपीक, सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर मनपा यांनी अर्जदार यांचा दि.२१/३/२०१६ रोजीचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी, आयुक्त कार्यालय, उल्हासनगर मनपा यांचेकडे हस्तांतरित केलेला नाही म्हणून ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम २०(१) अन्वये शास्तीस पात्र असून त्यांचेवर रू.२५०००/- इतकी शास्ती का लादण्यात येवू नये, याचा लेखी खुलासा (तक्रारकर्तास माहिती दिल्याचे पत्र, पोहोच पुराव्यासह) ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. **तसेच** आयोगाच्या दि.१६/३/२०१७ रोजीच्या आदेशातील मुद्दा क्र.४ नुसार दि.२१/३/२०१६ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरून (दि.३०/१२/२०१५ रोजीच्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईसंदर्भात माहिती) या माहितीसंदर्भात तत्कालिन जन माहिती अधिकारी, आयुक्त कार्यालय, उल्हासनगर मनपा यांनी माहिती दिलेली नाही म्हणून ते माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम २०(१) अन्वये शास्तीस पात्र असून त्यांचेवर रू.२५०००/- इतकी शास्ती का लादण्यात येवू नये, याचा लेखी खुलासा (तक्रारकर्तास माहिती दिल्याचे पत्र, पोहोच पुराव्यासह) ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**(भूपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ८ डिसेंबर, २०२३.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

१) तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.अच्युत सासे, मुख्य लिपीक, सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर मनपा,
२) तत्कालिन जन माहिती अधिकारी, आयुक्त कार्यालय, उल्हासनगर मनपा (दि.१६/३/२०१७ रोजी कार्यरत असलेले)

**-- यांना प्रत** सहायक आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१००३. **यांचेमार्फत रवाना.**